फोन नं. (02164) 272414, 8275706613
Web : http://gcekarad.ac.in
Email: principal@gcekarad.ac.in,

महाराष्ट्र शासन

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विद्यानगर, कराड पिन – ४१५१२४ जि. सातारा

जा.क्र.: शाअमक/अंतर्गत लेखापरीक्षण-सनदी लेखापाल सेवा/२०२६/2566
दि.: 20 NOV 2026

दरपत्रके मागणी

विषय : आर्थिक वर्ष -2026-2027 साठी अंतर्गत लेखापरीक्षणासाठी (Internal Audit) सनदी लेखापालाची नियुक्ती करणेसाठी दरपत्रक.

आर्थिक वर्ष 2026-2027 साठी अंतर्गत लेखापरीक्षण करणेसाठी पात्र व अनुभवी सनदी लेखापाल यांचे तात्पुरती नियुक्तीव्दारे अंतर्गत लेखापरीक्षण करणेसाठी दि. 30-11-2026 रोजी सायं. 5.00 पर्यंत दरपत्रक देणे आवश्यक आहे. दरपत्रकावर "आर्थिक वर्ष -2026-2027 साठी अंतर्गत लेखापरीक्षणासाठी (Internal Audit) सनदी लेखापालाची नियुक्ती करणे व संदर्भ क्रमांकाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

प्राप्त दरपत्रके दि. 01-12-2026 रोजी सकाळी 11.30 वा. उघडणेत येतील.

लेखापरीक्षण सेवा तपशिल	दर प्रती	जी.एस.टी. (रुपये)	एकूण रक्कम (रुपये)
आर्थिक वर्ष -2026-2027 साठी 1 एप्रिल, 2026 ते 31 मार्च, 2027 साठीअंतर्गत लेखापरीक्षण करुन लेखापरिक्षण अहवाल तयार करणे : 1. 1 एप्रिल, 2026 पासून क्वार्टरली पध्दतीने नियमित लेखा व्यवहारांचे सविस्तर परिक्षण करुन लेखापरिक्षण अहवाल संस्थेस देणे. 2. लेखाविषयक अंतर्गत नियंत्रण व्यवस्थेची तपासणी करणे व अहवाल देणे. 3. लेखाविषयक व वैधानिक अनुपालनांचा आढावा घेऊन तपासणी अहवाल देणे, आवश्यक सुधारणा सुचविणे 4. सर्व स्थिर मालमत्तांची 100% प्रत्यक्ष पडताळणी करणे. 5. वैधानिक लेखापरीक्षकांना आवश्यक असलेली आर्थिक माहिती तयार करणे व त्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे. 6. वैधानिक लेखापरीक्षकांकडून अंतिम मान्यतेसाठी सादर करणेकरीता वार्षिक वित्तीय विवरणपत्राचा मसुदा Excel स्वरुपात तयार करणे.	एकत्रित		

Terms & Condition :

1) अंतर्गत लेखापरिक्षण केल्याचा किमान 5 वर्ष अनुभव असणे आवश्यक.
2) संस्थेमधील आर्थिक व्यवहारांची लेखा विभागाकडून माहिती प्राप्त करुनच दरपत्रक देणे आवश्यक आहे.
3) सनदी लेखापाल नोंदणी प्रमाणपत्र
4) संस्थेमध्ये उपस्थित राहून लेखे तपासणी, जडसंग्रह तपासणी करुन लेखे तपासणी करणे आवश्यक आहे.
5) दर सर्व करांसहीत, व खर्चासह दयावेत, इतर अतिरिक्त शुल्क देय असणार नाही.
6) संपुर्ण लेखापरिक्षण अहवाल संस्थेस प्राप्त झालेनंतरच देयक अदा केले जाईल.

(डॉ. संजीव ज. बाघ)
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, कराड

प्रत : संस्थेचे संकेतस्थळ

Scanned with OKEN Scanner